# दलित साहित्य प्रवाहातील संस्कृती दर्शन: उर्मिला पवार यांच्या 'हातचा १' या कथासंग्रहाच्या अनुषंगाने

**पूजा भालचंद्र गांवकर**

मराठी, सहाय्यक प्राध्यापक, श्री. मल्लिकार्जून आणि श्री चेतन मंजू देसाई महाविद्यालय, देळे – काणकोण, गोवा.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259649

## ABSTRACT:

साहित्य हा समाजाचा आरसा मानला जातो. प्रत्येक साहित्यामध्ये त्या काळातील संस्कृतीचे दर्शन घडत असते. दलित साहित्य प्रवाहात अस्पृश्यतेविरुद्धचा लढा, समतेचा शोध, सामाजिक न्यायाची आकांक्षा आणि नव्या संकृतीचे दर्शन, त्याकाळातील संस्कृतीची मूल्यव्यवस्था, संघर्ष आणि बदल या सर्वांचा विचार येथे उर्मिला पवार यांच्या कथांच्या अनुषंगाने करण्यात आलेला आहे.

## KEYWORDS:

दलित प्रवाह, सांस्कृतीक दर्शन, न्याय, समता.

### प्रस्तावना:

कोणत्याही लेखनाची सुरुवात अत्मकथनातून होत असते. लेखकांनी अनुभवलेल्या जीवनाचे प्रतिबिंब यातूनच साहित्यात उमटत असते. जरी काळ बदलला, भूतकाळात सरकावला तरी त्या विशिष्ट काळात करण्यात आलेले लेखन तथ्य स्वरूपात आपल्या समोर राहते. त्यामुळे विशिष्ट काळाचा, त्या समाजाचा वा संस्कृतीचा अभ्यास करणे उपयुक्त ठरते. आजच्या काळाची तुलना गेलेल्या काळाकडे केली जाऊ शकते वा इतिहास पडताळून पाहिला जाऊ शकतो.

### दलित साहित्याचा उदय आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी:

भारतीय संस्कृतीत वेदकाळात वर्णव्यवस्थेनुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशी विभागणी करण्यात आली.'शुद्र' म्हणजेच दलित ज्यांना सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक सुखापासून वंचित ठेवले. 'दलित' म्हणजे दबलेली, चिरडलेली, जखडलेली व सुखसोयीपासून

वंचित राहिलेली माणसे'अशी सामान्यतः व्याख्या केली जाते.

मात्र ब्रिटीश वसाहतवादी राजवटीच्या प्रभावामुळे नवीन ज्ञान,तंत्रज्ञांन आणि उत्पादन यांचा प्रसार झाला व नवीन विचारसरणीला सुरुवात झाली. अशा दुर्लक्षित राहिलेल्या समाजाला या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी जाती व्यवस्थेवर तीव्र हल्ला केला. देशातील मागासवर्गीय, अस्पृश्य आणि महिलांना गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे आणि त्यांना सन्मानाने जीवन जगण्याची परवानगी दिली पाहिजे यावर ठामपणे भर दिला.

महात्मा फुले यांची प्रेरणा घेऊन पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याआवाहनाने दलितांमधील माणूस जागृत झाला. त्यांना गुलामगिरीच्या जीवनातून उठून स्वतःच्या मुक्ततेसाठी लढण्यास प्रवृत्त केले. १९४५ मध्ये मुंबईत पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. मुंबईत सिद्धार्थ कॉलेज सुरू केले. कारण शिक्षणामुळेच अस्पृश्यतेचे संकट दूर होऊ शकते असे त्यांचे ठाम मत होते. "शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा" याची जाणीव करून दिली.

आतापर्यंत समाजात इतर लोकांच्या तुलनेत वेगळे ठेवण्यात आलेल्या दलित लोकांना समाजातील प्रत्येक व्यवहारात मान्यता मिळावी. त्यांना पशुवत जीवन सोडून मानवी जीवन मिळावे यासाठी प्रयत्न केला. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक अशा विविध स्तरांवर त्यांची प्रगती व्हावी यासाठी आंबेडकरांनी क्रांतिकारी संघर्ष सुरू केला. भारतीय संविधानात आरक्षण धोरण लागू करून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

१९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी दलितांना हिंदू धर्म व जातिव्यवस्था नाकारून बौद्ध धर्म स्वीकारण्यास प्रेरित केले. यामागे केवळ धार्मिक महत्त्व नव्हते तर सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व देखील होते.स्वतः दलित, महार समुदायात जन्मलेले आंबेडकर यांनी अस्पृश्यतेविरूद्ध राष्ट्रीय धर्मयुद्धाचे नेतृत्त्व केले.

आंबेडकर यांनी त्याकाळी अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली. लोकांना शिक्षणाच्या आधारे स्वतंत्र जीवन जगता येते. ज्ञान मार्ग अवलंबून प्रगती करता येते. याची

जाणीव करून दिली. यातूनच १९६० नंतर शिक्षित पिढी कविता, आत्मकथनातून व्यक्त होऊ लागली आणि दलित साहित्याचा उदय झाला. दलित व दलितेतर लेखक आपल्या अनुभवांच्या व कल्पकतेच्या आधारे लेखन करू लागले. यामुळेच आज कथां, कादंबरी, नाटक, कविता, आत्मचरित्र अशाअसंख्य दलित साहित्याची निर्मिती झाली.

आपले अनुभव शब्दांत मांडून लेखकांनी आपल्या भावना लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. यातून दलित समाजाचे राहणीमान, जीवनशैली, संस्कृती, रूढीपरंपरा, भाषा इ. यांची ओळख लोकांना झाली. त्यांचे प्रश्न, विचार, त्यांच्यावर होणारे अन्याय, अपमान असे विविध विषय साहित्यातून प्रकट झाले.

समाज हा प्रवाहाबरोबर बदलत असतो. जसा काळ बदलतो तसा समाज व लोकांचीजीवनशैली बदलते. त्यामुळे काळानुसार साहित्यातून होणारे समाज व संस्कृती दर्शन यात फरक जाणवत असतो. त्यामुळे दलित साहित्याचा अभ्यास करत असताना तो विशिष्ट काळ लक्षात घेणे आवश्यक ठरते.

सुरुवातीला दलित साहित्याची निर्मिती विद्रोहाने, आक्रमकतेने व अन्यायावर विरोध करण्याच्या उद्देशाने झाली. मात्र नंतरच्या काळात समानतेवर ते भर देते. आपल्या हक्कांचा, अधिकारांचा व सुधारणेचा ते विचार करत असताना दिसते. दलित साहित्यातून समकालीन सामाजिक लोकशाही, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती प्रतिबिंबित झालेली असते.

**'संस्कृती' स्वरूप:**

"विशिष्ट समाजाची संपूर्ण जीवनपद्धती म्हणजे संस्कृती होय. संस्कृती ही देवाने दिलेली देणगी नसते तर समाज सभासद म्हणून मानवाने संस्कृतीचे सृजन केलेले असते."१ असे डॉ. भा. कि. खडसे यांचे मत मान्य करावे लागते. कारण संस्कृती ही मानव निर्मित असते. त्यामुळे त्यात निर्माण झालेली मुल्ये,नियम, मर्यादा वा व्यापकता ही माणसांनी माणसांसाठी बनविलेली असतात.

तर मानवशास्त्रज्ञ हरस्कोव्हिट्स यांनी 'संस्कृती मानव निर्मित आहे व वातावरणातील घटकांमध्ये मानवाने बदल करून संस्कृती

निर्माण केली आहे', या मतांना प्राधान्य दिले. म्हणजेच त्यांनी भौतिक संस्कृतीला महत्त्व दिले.

एडवर्ड टॉयलर या मानववंशशास्त्रज्ञाने "Culture is that complex whole which includes knowledge, belief, art, morals, law, custom and any other capabilities and habits acquired by man as a member of society."२ येथे त्यांनी 'ज्ञान, श्रद्धा, कला, नैतिकता, कायदा, रीतीरिवाज आणि एक सदस्य समाज म्हणून मानवाने मिळवलेल्या इतर कोणत्याही क्षमता आणि सवयींचा समावेश असलेली एक जटील संपूर्णता'असे संस्कृतीचे विश्लेषण केले आहे. आज त्यांची व्याख्या अधिक प्रमाणात वापरली जाते.

"Culture is the totality of learned, socially transmitted customs, knowledge, material objects and behavior. It includes the ideas, values and artifacts of groups of people."३ संस्कृती म्हणजे शिकलेल्या, सामाजिकरित्या प्रसारित झालेल्या रीतीरिवाजांचा, ज्ञानांचा, भौतिक वस्तूंचा आणि वर्तनाचा संपूर्ण संग्रह. त्यात लोकांच्या गटांच्या कल्पना, मुल्ये आणि कलाकृतींचा समावेश असतो.

येथपर्यंत भौतिक संस्कृतीचा विचार झालेला दिसतो. मात्र हॅरी जॉन्सन संस्कृतीतील अभौतिक स्वरूपास प्राधान्य देतात. त्यांनी संस्कृतीतील ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणके, चिन्हे या घटकांना महत्त्व दिले.

वरील सर्व संस्कृतीची व्याख्या लक्षात घेता समाजात माणसानीच माणसासाठी रिती, परंपरा, नियम बनविलेले आहेत. त्यामुळे दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार हे लोकांकडूनच झालेले आहेत. त्यांच्यावरची बंधने ही वर्चस्व मानणाऱ्या लोकांकडूनच घातली गेलेली आहेत. यातून बाहेर पाडण्यासाठी शिक्षण हे माध्यम असल्याचे फुले, आंबेडकर यांनी सांगितले. तसेच सुख, शांती, समता हे जीवनतत्त्व मानून चालणारा बौद्ध धर्म स्वीकारला.

**कथेच्या माध्यमातून आलेले दलित सांस्कृतिचे दर्शन:**

लेखिका उर्मिला पवार यांच्या २००४ साली प्रकाशित झालेल्या

'हातचा १' या काथासंग्रहाच्या माध्यमातून दलित समाजातील संस्कृतीचे दर्शन घडते. त्यांनी आपल्या कथालेखनाच्या माध्यामातून दलित समाजाशी संबंधित असलेल्या अनेक विषयांवर सकस लेखन केले.

या कथासंग्रहातील त्यांची पहिलीच 'धम्मचक्र' या कथेत सीताबाई 'आयदान' बनविणे ही आपली कला आहे,त्यावरच आपले पोट भरते, हे जाणून असते. परंपरेनुसार बांबूपासून वस्तू बनविण्याचा व्यवसाय दलित वर्ग करत आला. तिच परंपरा आपली असे मानून सीताबाई आपली संस्कृती पुढे नेत असताना दिसते. तसेच तिचानवरा जानूतात्या मरण पावतो तेव्हा, जीवचक्र आणि धम्मचक्र यांतले साम्य अंतर्यामी समजलेली ही अशिक्षित स्त्री त्याला पुरण्याचा आग्रह करते.'धम्मचक्र' म्हणजे बौद्ध धर्माचे प्रतिक असलेले चाक. प्रगती आणि जीवनाचे प्रतिक. प्रत्येक संस्कृतीत एक प्रतीकव्यवस्था रुजलेली असते. प्रतिकात एक भावनिक आशय असतो. त्यात आवाहक शक्ती असते. कोणतही चांगलं प्रतिक हे सहज प्रेरणांच आणि त्या प्रेरणामधून निर्माण झालेल्या भावशक्तीचं वाहक असतं.

हॅरी जॉन्सन यांच्या मतांनुसार एखादी संस्कृती अभौतिक स्थितीवर म्हणजेच एखादी सांस्कृतिक प्रमाणके व चिन्हांवर आधारित असते. तर याचाच प्रभाव कथेतील लोक जीवनावर झालेला दिसतो.

१४ ऑक्टोबर १९५६ हा 'धम्मचक्र प्रवर्तन दिवस' व भारतात 'बौद्ध सण' म्हणून मनवला जातो. हिंदू, बौद्ध, जैन, सिख हे पंथ एक आहेत व ते प्रगतीचे प्रतिक आहे. असे मानून समानतेचा येथे विचार करण्यात आलेला आहे.

स्वतःवर कोसळलेल्या दुःखाच्या क्षणीही तिची विवेकशक्ती जागी असते. पण दुर्दैवाने तिथे जमलेल्या तिच्या जातिबांधवांना तिचा हा विवेकवादी दृष्टीकोन समजू शकत नाही. अशिक्षित असूनही आपल्या रूढीपरंपरांची जाणीव वा समजूतदारपणा तिच्यात आहे. 'आयदान' बनविण्याचा व्यवसाय वा प्रेताला न जाळता पुरण्याची परंपरा जतन करण्यास ती तत्पर उभी आहे. परंतु सामाजिक बंधानापुढे,लोकांच्या निर्णयापुढे ती हतबल झालेली आहे.आजही ग्रामीण भागात दलितांना परकेपणाची जाणीव होताना या कथेतून दिसते. तसेच त्यांच्यात असलेल्या रूढी परंपरा यात मान्य केल्या जात नाहीत.

तर 'हातचा एक'या कथेचा गणित शास्त्रानुसार विचार केल्यास बेरीज करतेवेळी शिल्लक राहिलेला अंक हा दुसऱ्या अंकाच्या माथ्यावर 'हातचा' म्हणून दिला जातो आणि दुसऱ्या अंकात मिसळण्यात येतो. म्हणजेच एका परीने शिल्लक राहिलेल्या अंकाला त्यावेळी तेथे महत्त्व नसते. म्हणून दुसऱ्या जागेवर त्याला लादण्यात येत असते. असेच 'हातचा एक' या कथेतील काकी म्हणजेच विनोदिनी यांचे जीवन शिल्लक राहिलेल्या हातच्यासारखे आहे असे म्हणता येईल. ज्याला स्वतंत्र असा आपला जागा, मत वा विचार नाही.

तसेच माणसामधील किडनी हा अवयव असा आहे जो आपण इतरांना दान करू शकतो. म्हणजेच माणसाला जिवंत राहण्यासाठी दोन्ही किडनीची आवश्यकता नसते. अशावेळी काकींनी आपली एक किडनी दिनकरना म्हणजेच काकांना दिलेली आहे. जीवनात कोणत्याही शिल्लक गोष्टीला महत्त्व नसते. मग ते नाते, वस्तू वा एखादा सामाजिक गट असू शकतो. दलितांना समाजाने असेच शिल्लक ठेवले होते. ज्यांची सुरुवातीला स्वतंत्र अशी जागा नव्हती.अशा परिस्थितीलाकंटाळून त्यावेळी लोकांत विद्रोहाची भावना जागृत झाली.

'हातचा एक'या कथेसारखीच 'सुटे गिरान' ही कथा स्त्रीकेंद्री आहे. स्त्रियांना जीवनात कराव्या लागणाऱ्या अनेक तडजोडीं या कथेत पहायला मिळतात. 'सुटे गिरान' या कथेतील सुमती सबनीस ही दलित असून उंचीने फक्त ४ फुट आहे. एक अस्पृश्य व दुसरे बुटके म्हणून दोन पातळ्यांवरचे दुःख तिच्या वाट्याला आलेले आहे.मात्र ती शिकलेली आहे. नोकरीसाठी प्रयत्न करणारी आहे. ज्यात अनेक अडथळे येतात. तरीही स्वतःला सावरण्याचा ती प्रयत्न करते. नोकरीनिमित्त हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या मुलींचे दर्शन यातून घडते. तिच्या बुटक्या देहामुळे सुरेशने तिला नाकारले. लग्नासाठी पूर्ण स्त्रीदेहाची आवश्यकता असते. अशा विषयांवर लेखिका लेखन करतात. म्हणजेच उर्मिला पवार यांच्या कथां फक्त एकाच विषयांवर बोलत नाही. तर जातिव्यवस्थेबरोबरच, लोकांचे दृष्टीकोन,त्यांची मानसिकता सामान्य माणसांना जगण्यास अडचणी आणत असतात हाही विचार त्या घालून देतात.

तर 'वर्तुळ'या कथेत भारतीय संस्कृतीबरोबर मॉरिशस संस्कृतीचे दर्शन घडते. भारतीय रूढी, परंपरांवर वैतागलेली नायिका नेत्रा लग्न

करून मॉरिशस देशात स्थायीत होण्याचा विचार करते. कारण तिच्या मते पाश्चात्य संस्कृती स्वतंत्र असून त्यात इथल्यासारखे जात, धर्म, गोत्र, पाहण्याची प्रथा नाही.तिला जाती, धर्माच्या वर्तुळाबाहेर जाऊन मॉरिशससारख्या देशात स्थायीत व्हायचे आहे. परंतु हे तिचे स्वप्न अपुरे राहते. कारण तिकडेही रूढी, परंपरा, समजुती अस्तित्वात आहेत याची तिला कथेच्या शेवटी जाणीव होते.स्त्री म्हणून नेत्राचा विचार करताना ती आजच्या काळातील शिकलेली व स्टेनो टायपिस्ट म्हणून काम करणारी सुशिक्षित आहे. समाजातील जातीव्यवस्थेची तिला जाणीव आहे व अशा बंदिस्त वर्तुळातून तिला बाहेर पडायचे आहे.

'बस्ता' म्हणजे कापडाचा गठ्ठा, गट वा एखादा समूह. जातीय वर्गीकरण दाखवण्यासाठीही या शब्दाचा वापर केला जातो. समाजातील विभागणीचे प्रतीक म्हणजे बस्त्यानुसार वावर, विवाहसंस्था, सामाजिक उठबस या गोष्टी ठरवल्या जातात. अशे आशयातील विविध पैलू 'बस्ता' या कथेतून पुढे येतात. कथेतील नायिका 'उषा' व नायक 'उदय' यांच्या लग्नाच्या तयारीसाठी कपडे काढण्यासाठी ते व त्यांचे कुटुंब दुकानात आले आहे. अशावेळी लग्नासाठी नवरीने पांढऱ्या रंगाची साडी निवडण्याच्या भूमिकेवरून ते भिमराववाले म्हणजेच डॉ. आंबेडकर यांच्या समूहातील असल्याचे कळते. त्यावरून त्या दुकानात आलेल्या दलित लोकांवर व त्यांच्या संस्कृतीवर टीका होत असताना दिसते. "सालं, यांचं सगळंच उलटं – विधवेचा पोषाख सधवेला."४ सामान्यतः लग्नात लाल रंगाला महत्त्व दिले जाते. अशावेळी पांढऱ्या वस्त्राची निवड केलेली लोकांना स्वीकारणे कठीण जात असते. परंतु यामागे साधेपणाने लग्न करणे हे तत्त्व आहे. ज्यातून आर्थिक स्तरभेद जाणवणार नाही. हा उद्देश यामागे असलेला दिसतो.

तर 'जाब' या कथेच्या माध्यमातून दलित समाजातील कामगार वर्गाचे वर्णन करण्यात आले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही कथेतील सुदाम्याला आपण अजूनही पारतंत्र्यात जगत असल्याची जाणीव होते. दलित समाजाचा पारंपरिक व्यवसाय हा इतिहासाशी, सामाजिक रचनेशी आणि अस्पृश्यतेशी निगडीत आहे. प्राचीन काळात व नंतरच्या काळात त्यांना ठराविक कामांमध्येच गुंतवून ठेवण्यात आले होते. हे व्यवसाय मुख्यतः अस्पृश्य मानल्या गेलेल्या किंवा 'अशुद्ध' वाटणाऱ्या कामांशी जीडलेले होते. उदा: जनावरांच्या कातड्यापासून चप्पल

बनवणे, वाद्य वाजवणे, शववाहन करणे, गटार साफसफाई, स्वच्छता, शौचालय सफाई करणे, कपडे धुणे इ. या सर्व स्थितीचे दर्शन सुदाम्याच्या जीवनचित्रणातून झालेले आहे.

एखाद्या संघटना, पक्ष, समाजसेवा, संस्था इत्यादीसाठी कार्य करणारा सदस्य म्हणजे 'कार्यकर्ता'. आपले काम करण्यासाठी सामान्य लोकं या कार्यकर्त्याच्या पाठीमागे धावत असतात. परंतु आपल्याच माणसांची त्यात कामं झालेली नसतात. अशाच परिस्थितीत 'कार्यकर्ता' या कथेतील सयाजी या कार्यकर्त्याची बायको सुभद्रा गुरफटलेली आहे. राजकीय भ्रष्टाचारामुळे दाबल्या गेलेल्या मागासवर्गीय लोकांचे जीवन यात मांडण्यात आले आहे. तर 'धिंड' कथेत आपल्याच नवऱ्याने राजकीय लोकांसमोर आपल्या घरातील स्त्रियांची 'धिंड' काढलेली आहे. तसेच गावकुसाबाहेर ठेवण्यात आलेल्या गावांत मंत्री येण्याची उत्सुकता लोकांना, कार्यकर्त्यांना असलेली दिसून येते.

तर 'अर्थ' या कथेत प्रत्यक्ष गौतमबुद्ध खेमारणी यांना बाह्य सौंदर्यापेक्षा जीवनात आंतरिक सौंदर्याला महत्त्व असल्याचे पटवून देतात. आपया विचारणा श्रेष्ठत्व त्यांनी दिलेले आहे.

**समतेचा शोध:**

आंबेडकरी चळवळीचा प्रभाव धम्मचक्र, वर्तुळ, बस्ता, अर्थ यासारख्या कथांवर झालेला दिसतो. लोकांमध्ये समानतेची जाणीव निर्माण झाल्याचे दिसते. बौद्ध संस्कृतीला स्वीकारणे हे त्यामागे मुख्य कारण असलेले दिसते.

**स्त्री कथाकार:**

उर्मिला पवार या स्वतः शुद्र असल्यामुळे दलित चळवळींची पार्श्वभूमी आणि त्याली आपली स्थिती यावर त्यांनी बारकाईने विचार केला व आपल्या साहित्यातून मांडले. मुलाखतीत दिलेल्या माहितीप्रमाणे त्यांची आई बांबूपासून वस्तू करून विकायची. त्यामुळे त्यांच्या काही कथांतून अशा पारंपरिक व्यवसायावर लेखन झालेले आहे. तसेच त्यांच्यावर बौद्ध साहित्याचा प्रभाव असल्यामुळे तोही त्यांच्या लेखनातून दिसून येतो. त्यांच्या मते दलित स्त्रीची घुसमट जास्त निषेधार्ह आहे. कारण स्त्री म्हणून, दलित म्हणून व गरिबीच्या पातळीवरूनही होत

असते. 'हातचा एक' या कथेमध्ये एका ठेंगू मुलीच्या उंचीवर लेखन केले आहे. बाईसंदर्भातील आपल्याकडे सहज फॉर्म ठरलेले असतात. गोरी, सडपातळ, नाक चाफेकळी, ओठ गुलाबी इ. तर 'वर्तुळ' या कथेतील नेत्राला जातीव्यवस्थेतून बाहेर पडायचे आहे. अशा अनेक स्तरातील स्त्रियांवर त्या लिहितात.

**संदर्भग्रंथ:**


1. ढेरे, अरुणा. स्त्रीलिखित मराठी कथा(१९५० ते २०१०). पद्मगंधा प्रकाशन, १९६६, तारा भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे. २०१४.
2. खांडगे, मंदा. गुंडी, नीलिमा. आफळे, ज्योत्स्ना. स्त्री साहित्याचा मागोवा खंड ४ (इ.स.२००१ ते इ.स.२०१०). साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे. २०१५.
3. खडसे, भा. कि. समाजशास्त्र. हिमालय पब्लिशिंग हाउस प्रा. लि. 'रामदूत' डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई. २००९.
4. पगारे, म.सु. ग्रामीणदलित साहित्याचा अनुबंध, राजीव दत्तात्रय बर्वे, मॅनेजिंग डायरेक्टर, दिलीपराज प्रकाशन प्रा.ल्फ. २५१ क, शनिवार पेठ.
5. SOCIOLOGY Principles of Sociology with an Introduction to Sociological Thoughts, S. CHAND PUBLISHING, S Chand and Company Limited, 2012,
6. Schaefer, Richard T. SOCIOLOGY A Brief Introduction. Tata McGrawHill Publishing Company Limited, New Delhi, 2006.


**साधानग्रंथ:**


1. पवार, उर्मिला. हातचा १. अक्षर प्रकाशन७८, पांडुरंग बिल्डिंग, १७८, लेडी जमशेटजी रोड, वडाळा, मुंबई. २००४.



**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.



**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.